नियमित दिवाणी दावा क्र.१४६/२०२३
जुना नियमित दिवाणी दावा क्र.८६/२०१८
नंदकिशोर ..वि. शासन व इतर

## आदेश नि.क्र.४० वरील.
**(CNR No. MHYA230024632020)**

प्रस्तुतचा अर्ज फार पूर्वीपासून प्रलंबित आहे. प्रकरणाचा तपशिल पाहीला असता दोन्ही पक्षकार या प्रकरणात हजर नाहीत. दोन्ही मान्यवर विधिज्ञांनी प्रस्तुत अर्जावर युक्तीवाद देखील केलेला नाही. हा अर्ज बऱ्याच तारखांपासून एकाच पायरीवर प्रलंबित असल्यामुळे तो गुणदोषांवर निर्णित करण्याकरीता मी आज रोजी घेतलेला आहे.

२) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी दिवाणी प्रकिया संहितेचा आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल केलेला आहे. वादीच्या वकीलांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे नि.क्र.७१ वर मांडून तिव्र हरकत घेतली.

३) प्रस्तुत अर्जामध्ये वादीने आवश्यक न्याय मुद्रांक लावलेला नाही, दाव्यास आवश्यक पक्षकार जोडलेले नाही व दावा मुदतीत नाही म्हणून खारीज करण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली. त्यापैकी पहिला मुद्दा आवश्यक न्याय मुद्रांक लावलेला नाही याबाबत त्यांचे कथन असे आहे की, भूसंपादन अधिकारी यांनी वादशेतापैकी ०८आर क्षेत्र संपादीत करुन त्याची नुकसानभरपाईची रक्कम रुपये २५,५५,०९८/- नोंदविलेले आहे. वादीने त्या रकमेवर आवश्यक तो मुद्रांक दिलेला नाही. त्यांचे दुसऱ्या मुद्दयाबाबत असे कथन आहे की, वादशेत प्रतिवादी क्र.४ ते १३ यांची वडीलोपार्जीत मालमत्ता असून मुळ पुरुष चंपत हनवता शिंदे यांना पांडुरंग, मोतीराम, परमेश्वर ही तीन मुले आहेत व पदमिनीबाई, इंदुबाई

व मालूबाई हया तीन मुली आहेत. असे असतांना मुळ पुरुष चंपत यांची मुलगी मालूबाई हीला दाव्यात पक्ष जोडलेले नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या तिसरा मुद्दयाबात असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा कलम ५४ नुसार मुदतीत दाखल केलेला नाही.

४) प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जामध्ये मांडलेले मुद्दे व दाव्यातील संपूर्ण कथन याचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा करारपुर्तीकरीता व कायम स्वरुपी मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे वादशेताचे मालक पांडूरंग शिंदे व मोतीराम शिंदे यांच्याशी वादीचा वादशेत विक्री करण्याचा करार करण्यात आला होता. सदर करारानुसार वादशेताची किंमत प्रती एकर रुपये १,००,०००/–ठरविण्यात येऊन सौदयापोटी रुपये ५,०००/– त्या दोघांना दिल्याचे तसेच रुपये ८०,०००/– मोतीराम यांना दिल्याचे दाव्यात कथन मांडलेले आहे. प्रस्तुतचा दावा हा सौदाचिठ्ठीच्या आधारे दाखल करण्यात आलेला आहे. सदर करारानुसारच वादीने मुद्रांक शुल्क भरलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी जो आक्षेप न्यायमुद्रांकाबाबत नोंदविलेला आहे त्यात कसलेली तथ्य नाही.

५) प्रतिवादींचा दुसरा मुद्दा पाहीला असता प्रकरणाच्या तपशिलानुसार वादीच्या नि.क्र.४३ वरील आदेशानुसार मुळ पुरुष चंपती यांची मुलगी मालुताई आत्माराम पौळ यांना दाव्यात पक्षकार म्हणून जोडलेले आहे. त्यामुळे प्रतिवादींचा हा आक्षेप स्वीकारता येणार नाही.

६) प्रतिवादींचा तिसरा मुद्दा पाहीला असता त्यामध्ये केवळ मोघम स्वरुपाचा आक्षेप घेतल्याचे स्पष्ट दिसते. वादीने दाव्यातील परि.क्र.२२ मध्ये दाव्याचे कारण तारखेसहीत नमूद केलेले आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतचा दावा

मुदतीत कसा नाही याचा प्रस्तुतचा अर्जामध्ये ऊहापोह केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादींचा हा मुद्दा देखील स्वीकारता येणार नाही.

७) वरील चर्चेनुसार प्रतिवादींच्या प्रस्तुत अर्जात कसल्याही प्रकारचे तथ्य आढळून येत नाही. सबब, अर्ज खर्चासह नामंजुर होणेस पात्र आहे. म्हणुन पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज नि.क्र.४० खर्चासह नामंजुर.

BHURE HEMANT SATWARAO

Digitally signed by BHURE HEMANT SATWARAO
Date: 2025.10.30 18:04:32 +0530

दिनांक ३०/१०/२०२५

( **हेमंत एस.भुरे** )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
उमरखेड

**दा ख ला**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ.फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :- | रविंद्र रामचंद्र वरणकार, श्रेणी-२ |
| न्यायालयाचे नांव | :- | दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, उमरखेड |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | :- | ३०/१०/२०२५ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :- | ३०/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :- | ३०/१०/२०२५ |